सेकुलनात मोडत असल्यामुळे कमाल नागरी जमीन कायदा १९७६ चे कलम ६ [ ] खालील आवश्यक ते आमचे धारण क्षेत्रा बघलचे विवरणपत्र संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडे दाखल करणे व त्यामध्ये तदरची मिळकत ही रीटेनेबल म्हणून दर्शविणे.

५] सदरचे विवरणपत्रावर कलम ८ [३] खालील ड्राफ्ट स्टेटमेंट आलेनंतर त्याचा अभ्यास करून आवश्यक वाटल्यास त्यास हरकत घेणे व सदर प्रोसिडींगमध्ये आमची बाजू माडून कलम ८ [४] खालील डिक्लरेशन [आदेश] मिळविणे.

६] सदर कलम ८ [४] खालील आदेश योग्य न वाटल्यास त्याविरूध्द सक्षम प्राधीकारिणी न्यायालयामध्ये अपिल/रिव्हीजन दाखल करणे व ते चालविणे व त्यास्तव आवश्यक त्या सर्व गोष्टी करणे.

७] सदरचे मिळकतीचा योग्य विकास करण्यासाठी संबंधित सक्षम यू.एल.सी. ऑथॉरिटीजकडून आवश्यक ती विकास परवानगी वा ना हरकत दाखला मिळविणे किंवा सदर कायद्याचे कलम २०,२१, वा २२ खालील स्कीम मंजूर करवून घेवून सदर मिळकतीचा विकास करणे. त्यास्तव विनंती अर्ज करणे, आवश्यक ते कागदपत्रे सादर करणे, सदर कामी, अॅफिडेव्हीट, हमीपत्र,

गुलाब निळकं

विठ्ठल

कृष्णा सोर

उहवेली - ३
दसत क्र २५८ /०५
८८ / ११८

९२ / १३५

जाहीरनामे देणे, जाबजबाब देणे व सदर आवश्यक ते आदेश मिळविणे वा स्कीम मंजूर करवून घेणे वा सदर मिळकत डेव्हलपर्सचे नावें ट्रान्सफर करण्यासाठी कलम २६/ज खालील आवश्यक ती परवानगी मिळविणे.

८]  सदरची मिळकत ही सध्या शेतीचे वापरात आहे तेव्हा ती विकसीत करण्याच्या दृष्टीने रहीवासासाठी बिनशेती करवून घेण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे, प्रांत अधिकारी ठाणे वा तहसिलदार उल्हासनगर यांजकडे आवश्यक ते बिनशेती प्रपोजल/ले-आऊट सादर करून त्या कामी आवश्यक ती कागदपत्रे दाखल करणे, अँफिडेव्हीट, जाबजबाब, हमीपत्रे, जाहीरनामे देणे व मिळकत बिनशेती करवून घेणे. सदर आदेशानुसार भरावा लागणारा कन्व्हरशन टॅक्स भरणे.

९]  डी.आय.एल.आर. ठाणे वा टी.आय.एल.आर. उल्हासनगर/कल्याण यांजकडून सदर मिळकतीचा सर्व्हे वा मोजणी करवून घेणे. त्यास्तव आवश्यक तो विनंती अर्ज सादर करणे. सर्व्हे फी भरणे व मोजणीचा नकाशा मिळविणे.

१०]  सदर मिळकतीचे तारणावर कर्ज मिळविणे. त्यास्तव आवश्यक त्या बँकेकडे वा फायनान्स इन्स्टीट्यूटकडे लोन प्रपोजल सादर करून पूढील आवश्यक ती कागदपत्रे

उहन - १
दस्त क्र. २५७ / २०
८८ / ११७



दाखल करणे, आवश्यक ते डॉक्यूमेंटस् एक्झीक्यूट करणे, मॉरगेज डीड [गहाणपत्र] करून ते दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर यांचेकडे सादर करणे व नोंदवून घेणे. थोडक्यात लोन प्रपोजल मंजूर होणेसाठी सर्व संबंधित वा आवश्यक त्या गोष्टी करणे.

११] सदरची मिळकतीचा काही भाग अतिक्रमणीत असेल वा कोणी वहिवाट दाखवीत असेल, किंवा कुणी कब्जा/ताबा क्लेम करीत असेल तर अशा व्यक्ती संस्थेविरूद्द आवश्यक ती दिवाणी/फौजदारी कारवाई करून ते अतिक्रमण काढून घेणे वा ताबा/कब्जा वा वहिवाट सोडवून घेणे. या संदर्भात आमचे अखत्यारांस योग्य वाटल्यास अशा व्यक्ती/संस्थेबरोबर समझौता घडवून आणणे व समझौत्यानुसार आवश्यक ते कॉम्पेनसेशन/सेटलमेंट रक्कम देणे व त्याचे समवेत आवश्यक ती कागदपत्रे, डीडस् करणे ती दुय्यम निबंधक साहेब उल्हासनगर यांचेसमोर नोंदणी साठी सादर करून ती मान्य करून नोंदवून घेणे व त्याकामी येणारा सर्व प्रकारचा खर्च करणे.

१२] कल्याण महानगर पालिका वा इतर विकास प्राधिकारीणी यांचे नियमाप्रमाणे सदर मिळकतीवर बांधावयाचा इमारतींचा आराखडा, त्याचे डिझाईन्स, स्पेसी फिकेशन्स, तयार

२८ / ११७

करून त्या संबंधीत सक्षम प्राधिकारणी कडे सादर करणे किंवा मूळचा मंजूर झालेला प्लॅन त्यामध्ये बदल करण्याचे ठरल्यास रिव्हाइज करून पुन्हा एकवार त्यास सादर करणे. त्या बाबत जे काही टेक्नीकल एक्सपार्टस लागतील जसे की, आर्किटेक्स , इंजिनियर्स, सर्व्हेअर वा इतर संबंधीत व्यक्तींस ह्यांची सेवा उपलब्ध करून घेणे.

१३] सदर मिळकतीचा विकास करण्याचे दृष्टीने ज्या ज्या कोणत्या प्राधिकारीणी किंवा सरकारी अधिकारी कल्याण महानगर पालिका, जिल्हाधिकारी ठाणे, तहसिलदार उल्हासनगर व इतर महसूल अधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारीणी नागरी संकूलन उल्हासनगर वगैरे खात्यांकडे /अधिकाऱ्यांकडे आवश्यक ते पत्र व्यवहार किंवा बोलणी आमच्या वतीने करून योग्य ती परवानगी वा ना हरकत दाखला मिळविणे.

१४] संबंधित प्राधिकारिणी/अधिकारी ह्यांच्या समोर हजर राहून सदर मीळकतीचे विकासासाठी आवश्यक ते करार करणे वा त्यांस आवश्यक ते लेख की, ज्यामध्ये ॲफिडेव्हीट, डिक्लरेशन, हमीपत्रे इत्यादी देणे. सदर मिळकतीचे विकास कार्यासाठी आवश्यक ते टेक्नीकल किंवा लिगल व्यावसायिक जसे की, इंजिनियर्स, सुपर वायझर्स, कॉन्ट्रक्टर, सब-कॉन्ट्रक्टर,